१७

21/11/98

# राष्ट्रीय सेवा योजनेतून राष्ट्रीय विचारांची जोपासना होते - पाटील

हातकणंगले, दि. २० (वार्ताहर) : राष्ट्रीय सेवा योजनेतून आदर्श व्यक्ती आणि राष्ट्रीय विचारांची जोपासना होते, असे मत कमला कॉलेजचे प्राचार्य क्रांतिकुमार पाटील यांनी व्यक्त केले. ते अतिग्रे येथे राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय रूकडीच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन समारंभात बोलत होते.

रूकडी येथील बाळासाहेब माने एज्युकेशन ट्रस्टच्या राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने दहा दिवसांचे राष्ट्रीय सेवा योजनांचे विशेष श्रमसंस्कार शिबिर सुरू असून या दहा दिवसांमध्ये रोजच्या रोज श्रमदान आणि व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती या विभागाचे प्रकल्पाधिकारी एस. आर. दळवी आणि ए. एस. पाटील यांनी दिली.

या श्रमसंस्कार शिबिरामध्ये विद्यार्थीवर्गाकडून गावातील आरोग्य, वृद्धांची जोपासना, रस्त्यांची डागडुजी इत्यादी जनमानसाशी निगडित कामांचे श्रमदान होत आहे.

या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे न्यू कॉलेजचे प्राचार्य सी. आर. गोडसे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. तसेच प्रास्ताविक राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य ए. बी. राजगे यांनी केले. स्वागत अतिग्रेचे सरपंच श्रीधर पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती निवेदिता माने म्हणाल्या की, कै. खा. बाळासाहेब माने यांनी शिक्षणातून श्रमसंस्कार असे स्वप्न पाहिले होते. महाविद्यालयाच्या या विशेष श्रमसंस्कार शिबिरामुळे त्यांचे स्वप्न सत्यात उतरले आहे. कठीण परिस्थितीतील ध्येयवादाची पूर्तता करण्यासाठी हे विशेष श्रमसंस्कार शिबिर असल्याचे मत व्यक्त केले.

# कुर्ला, कमला कॉलेज आदी विजयी

वेळापूर, दि. २० (वार्ताहर) : अकलूज शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या महिलांच्या आंतरविभागीय हँडबॉल स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात ए. आर. कुर्ला महाविद्यालय, सोलापूर, शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज, कमला महिला महाविद्यालय, कोल्हापूर व शारीरिक शिक्षण महाविद्यालय, उचगाव यांनी आपले विजय नोंदवले. दुसरा सामना कमला महाविद्यालय, कोल्हापूर विरुद्ध कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय सांगलीदरम्यान होऊन हा सामना कमला महाविद्यालय कोल्हापूर संघाने एकतर्फी जिंकला.

21/11/98